दैनिक महाराष्ट्र **सूर्योदय**
www.esuryodaylive.com
Email : suryodaykokan.123@gmail.com
मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)

24 तास सेवा || श्री नागनाथ कृपा || प्रो.प्रा.यमपुरे अशोक 8014842121
सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स
CHEMIST & DRUGIST
शुगर,बीपी,थायरॉड,अस्थमा तसेच मुंबई,पुणे,औरंगाबाद, लातुर,बार्शी,सोलापुर,नगर येथील मेडिसिन मिळेल
सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील
मन्मथस्वामी चौक,पाटोदा रोड,मांजरसुंबा ता.जि.बीड

कोकण || वर्ष २२ || अंक २४२ || शनिवार १७ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## तळा शहरात मुख्यमंत्री लाडकी बहिणीच्या पैशाची चौकशी साठी बँकेत गर्दी

अनेकांच्या खात्यात पैसे जमा झाल्याने महिलांमध्ये आनंद.

तळा कृष्णा भोसले

तालुक्यातील एकमेव आटोपून बँकेत धाव घेतली. त्यामुळे बँकेत खुप गर्दी दिसणारच यात शंका नाही. ज्याच्यां खात्यात पैसे जमा झाले त्यांच्या चेहऱ्यावर हसु दिसत होती. तर ज्याना पैसे जमा झाले नाहीत त्यांना सुद्धा आपले पैसे जमा होतील अशी खात्री आहे. कारण कालच मंत्री अदिती तटकरे



असलेल्या तळा शहरातील बँक ऑफ इंडिया तळा शाखेत प्रचंड गर्दी दिसुन येत आहे.

या महिलांच्या बँक खात्यात पैसे जमा झाल्याचे मॅसेज आल्याने सकाळी आपली घरची कामे यांनी तळा वासीयाना तशी खात्री दिली आहे.एकंदरीत सणासुदीच्या दिवसात मिळालेल्या या लाडकी बहिणीच्या खात्यात पैसे आल्याने मुख्यमंत्री व शासनाचे आभार मानले आहेत.

## साद सह्याद्री प्रतिष्ठानच्या स्वातंत्रदिनाच्या वृक्षारोपण मोहिमेला उस्फुर्त प्रतिसाद!

### महाड आणि आसपासच्या गावांमध्ये शेकडो वृक्षांचे रोपण

तळा कृष्णा भोसले.

साद सह्याद्री प्रतिष्ठानच्या



स्वातंत्रदिनाच्या वृक्षारोपण मोहिमेला परिसरातील नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. आसनपोई, निगडे, किये, भांडेकोंड, नाते, माझेरी, खर्डी, पारवडी, नाते कुंभारकोंड, सोलमकोंड, मांघरून, जाधववाडी, पारमाचीवाडी, ढालकाठी, भावेपठार, रावढल, वाकी गावठाण, आमशेत कोंड, कोल, वाकी शिवाजीनगर, शेंदूर मलाई या गावांमध्ये आणि महाड शहर तसेच शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले.ङ्गया मोहिमेत माजी सैनिक, विद्यार्थी, तरुण-तरुणी आणि वयोवृद्ध पर्यावरणप्रेमींनी उत्साहात सहभाग घेतला. या वृक्षारोपणामुळे परिसरातील हिरवळ वाढेल, पर्यावरण संतुलन राहील आणि भविष्यातील पिढ्यांना स्वच्छ हवा मिळेल.ङ्गहि मोहीम यशस्वी करण्यासाठी स्थानिक गावातील मंडळे, सामाजिक कार्यकर्ते आणि साद सह्याद्री प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि स्वयंसेवक यांनी या मोहिम यशस्वी करण्यासाठी खुप परिश्रम घेतले. मोहीम यशस्वी रीत्याङ्गपार पडली.

## तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या समस्यांसंदर्भात स्वातंत्र्यदिनी उपोषणास बसलेल्या अरविंद येलवे यांचे दुसऱ्या दिवशी आश्वासनानंतर उपोषण स्थगित



मंडणगड - मंडणगड तालुक्याचे विकास प्रश्न सोडवले जावेत व पायाभुत सुविधांची वानवा दुर व्हावी या करिता स्वातंत्र्यदिनी तहसिल

कार्यालय मंडणगडचे आवारात मंडणगड तालुका संघर्ष समितीचे अध्यक्ष अरविंद येलवे व सचिव रोशन राजविलकर हे आपल्या पाठीराख्यासंह उपोषणास बसले होते. दुसऱ्या दिवशी दिनांक १६ ऑगस्ट रोजी तहसीलदार श्री. गुरव, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे सहाय्यक कार्यकारी अभियंता महाडकर, ठेकेदार श्री. राजमाने यांनी उपोषणकरत्यांचे मागणी मान्य करून पुढील कार्यवाही आठ दिवसात पूर्ण करण्याच्या आश्वासनानंतर उपोषण एक दिवसासाठी स्थगित करण्यात आले आहे.

## चिपळूण मेमन समाज्याच्या वतीने विविध कार्यक्रमांनी भारतीय स्वतंत्र दिवस साजरा ; रामपुर येथे टीबी रुग्णांना खाऊ वाटप

चिपळूण (ओंकार रेळेकर)

चिपळूण मेमन जमात ही या क्षेत्रातील नामवंत अशी समाजसेवा करणारी संस्था आहे.सालाबाद प्रमाणे यंदा ही स्वत्तंत्रता दिवस १५ ऑगस्ट याचे औचित्य साधून गुरुवारीङ्गवेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन या संस्थेमार्फत करण्यात आले होतेङ्गगुरुवारी सकाळी ८:३० वाजता समस्त मेमन समाज तर्फे उकताड येथे समाजाच्या जागेत झंडावंदन कार्यक्रमचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर आलेल्या सर्व सभासद व पाहुणे मंडळी साठी उत्कृष्ट पध्दतीच्या नष्ट्याचे आयोजन करण्यात आले होतेङ्गतसेच ससंथेतर्फे चालविण्यात येणाऱ्या लेडीज़ ट्रेनिंग सेंटर मध्ये सुद्धा विद्यार्थी , ट्रेनर व सर्व महिला पदाधिकारी यांच्या मार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन करून स्वतंत्रता दिवस साजरा करण्यात आलेङ्गसमजाला एक मदतीचा हात म्हणून या वर्षी रामपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट देऊन तेथील टीबी पीडित रुग्णांना प्रोटीन युक्त खाद्य पदार्थाचे किट वाटप करण्यात आलेङ्गया सर्व कामांमध्ये मातृसंस्था ऑल इंडिया मेमन जमात फेडरेशन चे अध्यक्ष इकबाल मेमन ऑफिसर साहेब यांचे मार्गदर्शन लाभले असूनङ्गसंस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच युथविंग चे सर्व मेम्बर्स तसेच लेडीज़ विंग चे सर्व पदाधिकारी यांनी मेहनत घेऊन कार्यक्रम उत्तम पधतीने पार पाडले.



## जॅक अँड जिल इंग्लिश स्कुलच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र दिनी दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

पाली /बेणसे (धम्मशील सावंत ) देशाच्या स्वातंत्र्य दिनी जॅक अँड जिल इंग्लिश स्कुलच्या संचालिका प्रभा द्रविड यांच्या मार्गदर्शनाखाली चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कृतीतून पर्यावरण संरक्षण संवर्धनाचा संदेश दिला. पाली तहसील कार्यालयात लहानग्यांनी आपले देश प्रेम दाखविताना उपस्थित मान्यवरांना रोपटे भेट देऊन झाडें लावा झाडें जगवा चा संदेश दिला. तर हातात फलक घेऊन वीज पाणी जपून वापरा, कागदी पिशव्या वापरा, प्लास्टिकचा वापर करा असा संदेश दिला. हर घर तिरंगा हो, हर आंगण मे हरियाली हो, स्वच्छ सुंदर भारत हो या आशयाचे फलक लक्ष वेधी ठरत होते. जॅक अँड जिल च्या चिमुकल्या मुलांनी अतिशय उत्साहाने रोपे वाटप केले. तहसीलदार उत्तम कुंभार, नगराध्यक्ष प्रणाली शेळके, नगरसेवक, ज्येष्ठ नागरिक व इतर अधिकारी यांनी मुलांचा उत्साह व देश प्रेम पाहून कौतुक केले. संचालिका प्रभा द्रविड नेहमीच आपल्या शाळेत वेगवेगळ्या सामाजिक सेवाभावी उपक्रमाद्वारे राष्ट्रहित जोपासण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील असतात. विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव देण्यासाठी शाळेत सांस्कृतिक, विधायक आणि समाजपयोगी उपक्रम राबवितात. अशा उपक्रमातून आजचे विद्यार्थी आदर्श आणि देशाचे भावी नागरिक घडत असतात, असे प्रभा द्रविड यांचे म्हणणे आहे.



## स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून तिडे येथे वृक्षारोपण

शेनाळे प्रतिनिधी

१५ ऑगस्ट २०२४ रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून भैरी गावदेवी क्रिकेट संघ तिडे यांनी रोड लगत वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला होता.यामध्ये विविध प्रकारची साधारण २०० झाडे लावण्यात आली.या झाडाची व्यवस्था तिडे तळेघर ग्रामपंचायती मार्फत करण्यात आली. या कार्यक्रमासाठी तिडे-तळेघर ग्रामपंचायतचे ग्रामसेवक श्री.शरद बुध,श्रीम.मुमताज धनसे (सरपंच),श्री.अरुण माने(उपसरपंच)श्री.देवीचंद गणवे (तिडेगाव अध्यक्ष),श्री.मंगेश ठोंबरे (संस्थापक भैरी गावदेवी क्रिकेट संघ तिडे) श्री.संतोष खैरे,सिद्धांत ठोंबरे, जितू पडेल,राकेश ठोंबरे,विघ्नेश ठोंबरे,अमोल कळवणकर,समीर येसरे,अभिजीत,येसरे,जितू येसरे,रोहित बर्वे,सतीश अष्टमकर,मुकेश येसरे,निलेश मोरे, राजेंद्र जाधव आदी.उपस्थित होते.



## श्रीवर्धन मधील बँकांमध्ये लाडक्या बहिणींची पैसै काढण्यासाठी एकच गर्दी.

बोर्लीपंचतन: (कुणाल माळवदे ) मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाडक्या बहिणीच्या बँक खात्यामध्ये पैसे



जमा होण्यास सुरुवात झाली आहे ते पैसे काढण्यासाठी श्रीवर्धन तालुक्यासह इतर परिसरातील बँकांमध्ये महिलांची मोठ्याप्रमाणावर गर्दी पाहायला मिळत आहे. जास्तीत जास्त या योजनेचा पात्र महिलांना लाभ मिळावा या साठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील आहे. गेल्या दोन ते तीन दिवसांपासुन जुलै व ऑगस्ट या महिन्यांचा सन्मान निधी रुपये तीन हजार महिलांच्या खात्यामध्ये जमा होण्यास सुरवात झाली आहे त्यामुळे सकाळपासून महिलांची पैसे काढण्यासाठी चांगलीच गर्दी झाल्याने बँक कर्मचारी देखील भांबावून गेले आहेत.

महाराष्ट्र शासनाकडून रक्षाबंधन आधी हा निधी उपलब्ध झाल्याने सर्वत्र शासनाचे तसेच महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांचे आभार मानले जात आहेत

संपादकीय

## संवेदनशील

केरळच्या वायनाड जिल्ह्यात नैसर्गिक आपत्ती काही नवीन नाही. गेल्या काही वर्षांत केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगात अशांतता निर्माण झाली आहे. पृथ्वीवर कुठे तरी पूर, भूकंप, त्सुनामी किंवा महामारीच्या उद्रेकाबद्दल आपण दररोज ऐकतो. या नैसर्गिक आपत्तींमुळे केवळ मानवच नाही तर पृथ्वीवरील सर्व सजीवांना जगणे कठीण होत आहे. विकासाच्या नावाखाली मानव आपल्या मूर्खपणामुळे आणि पर्यावरण विषयीच्या असंवेदनशीलतेमुळे आपला जीव धोक्यात घालत आहे, असे म्हणता येईल. आपल्या भावी पिढ्यांना सर्वात गंभीर धोक्याचा सामना करावा लागणार आहे.वायनाड हा एक डोंगराळ जिल्हा आहे, जो पश्चिम घाटाखाली येतो. २९ जुलै रोजी रात्री उशिरा येथे अनपेक्षितपणे मुसळधार पाऊस झाला, ज्याचे मोजमाप ३४ सें.मी. त्यामुळे पुरामुळे इरुवाझिंजीपुझा नदीवर मुंडक्काई ते चुरलमळा दरम्यान बांधलेला पूल कोसळून दरड कोसळली. अचानक मोठ्या आवाजाने खडक आणि जमीन बुडू लागली आणि ढिगारा खाली पडू लागला. मुंडक्काई, चुरामाला, अट्टामाला आणि नूलपुझा या भागांना त्याचा फटका बसला. घरे, पूल, रस्ते, वाहने वाहून गेली. मोठ्या संख्येने लोक मरण पावले आणि अनेक बेपत्ता आहेत. केरळ फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूटचे शास्त्रज्ञ डॉ. टी. व्ही. संजीव नकाशाच्या मदतीने स्पष्ट करतात, ''या जिल्ह्याला अतिशय संवेदनशील ठिकाण म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. असे असूनही, हे चुरमला शहरापासून ४.५६ किमी आणि मुंडक्काई शहरापासून ५.९ किमी अंतरावर आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणावर खाणकाम होत आहे, त्यामुळे या भागातील वनस्पती अतिशय संवेदनशील आहेत. डॉ. टी. व्ही. संजीव पुढे सांगतात, ''काही वर्षांपूर्वी केरळ सरकारने बनवलेला नवीन कायदा वृक्षारोपणाचा काही भाग इतर कामांसाठी वापरण्याची परवानगी देतो परिणामी, रबर बागायतदारांचे लक्ष पर्यटन क्षेत्राकडे वाढले. कारण दरवर्षी परदेशी पर्यटकांसह २५ हजार पर्यटक येथे येतात, त्यांना राहण्यासाठी मोठमोठ्या इमारती बांधून ओबडधोबड जमीन देण्यात आली होती.वायनाडमधील घटत्या जंगलांवरील २०२२ च्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, १९५० ते २०१८ दरम्यान जिल्ह्याचे ६२ टक्के हिरवे आच्छादन नाहीसे झाले आहे, तर लागवड क्षेत्रात जवळपास १८०० टक्क्यांनी वाढ झाली आहे. इंटरनॅशनल जर्नल ऑफ एन्व्हायर्नमेंटल रिसर्च अँड पब्लिक हेल्थमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार १९५० पर्यंत वायनाडच्या एकूण क्षेत्रफळाच्या ८५ टक्के भाग जंगलाखाली होता. आता हा परिसर रबर लागवडीसाठी ओळखला जातो. रबराच्या झाडांमुळे भूस्खलनाची तीव्रता वाढली, जी लागवडपूर्व काळातील घनदाट जंगल क्षेत्राच्या तुलनेत माती धरून ठेवण्यासाठी कमी प्रभावी आहेत. संवेदनशील भागात अविचारी बांधकामे देशभरात, विशेषतः डोंगराळ आणि डोंगराळ भागात अशा आपत्तींना आमंत्रण देत आहेत. तज्ज्ञांनी ठळकपणे सांगितले आहे की, केरळमधील रस्ते आणि कल्व्हर्टच्या विस्तृत बांधकामाने सध्याच्या पावसाचे स्वरूप आणि तीव्रता विचारात घेतलेली नाही, परंतु जुन्या आकडेवारीवर अवलंबून आहे. फ्लॅश पूर टाळण्यासाठी बांधकामामध्ये नवीन जोखीम घटकांचा विचार करणे आवश्यक आहे, कारण अनेक संरचना नदीच्या प्रवाहाला सामावून घेण्यास अपयशी ठरतात, ज्यामुळे लक्षणीय विनाश होतो. अवैज्ञानिक बांधकाम पद्धती हे सध्याच्या विनाशाचे प्रमुख कारण आहे.

इस्रोचे माजी प्रमुख डॉ. के कस्तुरीरंगन यांच्या नेतृत्वाखालील इस्रोच्या उच्चस्तरीय कार्यगटाने आपल्या एका अहवालात देशातील ३१ जिल्हे भूस्खलनामुळे सर्वाधिक प्रभावित झाल्याचे घोषित केले होते. त्यात वायनाडचेही नाव होते. पर्यावरण तज्ज्ञ माधव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालील पश्चिम घाट इकोलॉजी एक्स्पर्ट पॅनलने ज्या ठिकाणी अपघात झाला ते ठिकाण अतिसंवेदनशील म्हणून घोषित केले होते. मात्र राज्य सरकारने माधव गाडगीळ पॅनेलच्या सूचनेकडे दुर्लक्ष केले. वायनाड हे एकेकाळी हिरव्यागार पश्चिम घाटातील एक रमणीय हिल स्टेशन होते, जे त्याच्या विस्तीर्ण चहाच्या मळ्यांसाठी ओळखले जाते. बाहेरून येणाऱ्यांचे नेहमीच लोकांच्या जिव्हाळ्याने आणि उत्साहाने स्वागत होत असे. वायनाड हे काबिनी आणि चालियार सारख्या नद्यांचे मूळ ठिकाण आहे. घनदाट जंगले आणि पर्वत हे या जिल्ह्याचे सौंदर्य होते. हे विविध जैविक अभयारण्ये, वन्यजीव अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने यांचेही घर होते.सुमारे २२ हजार लोकसंख्या असलेली ४ गावे अवघ्या ४ तासांत भूस्खलनाने पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. घरे ढिगाऱ्याखाली गाडली गेली आणि शेकडो लोक ढिगाऱ्याखाली गाडले

# राज्यस्तरीय पर्यावरण बालनाट्य महोत्सवाचे आयोजन, पर्यावरण व कांदळवनांचे महत्त्व अधोरेखित, हजारोंची बक्षीसे व पारितोषिक

पाली/बेणसे
(धम्मशील सावंत)

कांदळवन कक्ष, महाराष्ट्र वन विभाग, मॅंग्रव्हज फाऊंडेशन, मुंबई, रंगोत्सव आणि पी. एन. पी. एज्युकेशन संस्था अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय माध्यमिक पर्यावरण बालनाट्य महोत्सवाचे आयोजन शुक्रवारी (ता.३०) अलिबाग येथील पी. एन. पी. एज्युकेशन संस्थेच्या सभागृहात करण्यात आले आहे. यासाठी प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम दिनांक मंगळवार (ता.२०) आहे. महोत्सवाचे हे १३ वे वर्ष असून विद्यार्थी दशेतच मुला-मुलींमध्ये पर्यावरण रक्षणाविषयी जागरूकता निर्माण व्हावी, अंगभूत अभिनय कलेला योग्य दिशा मिळावी या उद्देशाने हा महोत्सव आयोजित केला जातो. माध्यमिक शाळांना तसेच शिक्षकांना पर्यावरणपर लेखन, दिग्दर्शनास प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून या वर्षी सुद्धा लेखन, दिग्दर्शन, सांघिक सर्वोत्कृष्ठ बालनाट्य या करीता रोख पारितोषिके, प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहेत.

विषय

विषय''समुद्र तटरक्षक ''कांदळवन'' - संवर्धन आणि संरक्षण'' ''कांदळवन... मित्र की शत्रू?''

''कांदळवनाचे महत्त्व''

अधिक माहिती व सहभागासाठी संपर्कपरेश पिंपळे ९८२११९४३९६, स्वप्नील केणी: ९०२८६७८३३८

पर्यावरण बालनाट्य महोत्सव पारितोषिके सर्वोत्कृष्ठ सांघिक बालनाट्य पारितोषिके प्रथम- रु.१०,०००/-, स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र. द्वितीय- रु.७,०००/-, स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र. तृतीय- रु. ५,०००/-, स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र. उत्तेजनार्थ १ - स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र. उत्तेजनार्थ २ - स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र.वैयक्तिक पारितोषिके

सर्वोत्कृष्ठ लेखनप्रथम- रु. १,५००/- स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र. द्वितीय- रु. १,०००/ - स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र.




तृतीय- रु. ५००/- स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र.

सर्वोत्कृष्ठ दिग्दर्शन प्रथम- रु.१,५००/- स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र. द्वितीय- रु.१,०००/-स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र. तृतीय- रु.५००/-, स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र.

सर्वोत्कृष्ठ अभिनय मुले प्रथम- रु.५००/-, स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र. द्वितीय- रु.३००/-, स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र. तृतीय- रु. २००/-, स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र.सर्वोत्कृष्ठ अभिनय मुली

प्रथम- रु.५००/-, स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र. द्वितीय- रु.३००/-, स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र. तृतीय- रु.२००/-, स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र

नियम व अटी

* प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम मुदत २० ऑगस्ट २०२४
* सादरीकरणासाठी वेळमर्यादा कमीत कमी १२ मिनिटे व जास्तीतजास्त १५ मिनिटे.
* वयोगट - माध्यमिक शाळातील विद्यार्थी-विद्यार्थिनी.
* शालेय संघांनाच प्रवेश.
* ओळखपत्र आवश्यक.
* भाषा- मराठी, हिंदी, इंग्रजी.
* संहिता लेखकाचे परवानगी पत्र आवश्यक.
* संघाला दिलेली वेळ पाळणे बंधनकारक.
* १२ पेक्षा अधिक संघांची नाव नोंदणी झाल्यास प्राथमिक फेरी घेण्यात येईल. आणि या संघांनी आपल्या नाटकाची १० मिनिटांची व्हिडीओ आयोजकांकडे पाठवणे बंधनकारक आहे.* सादरीकरणासाठी आवश्यकता भासल्यास आयोजकांतर्फे ४ खुर्चा, २ टेबल पुरवण्यात येईल.
* परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.* महोत्सवात ऐनवेळी बदल करण्याचा तसेच स्पर्धा रद्द करण्याचा हक्क संयोजकांनी राखून ठेवला आहे.

सुधागड ता. वनपरिक्षेत्र अधिकारी-अश्विनी तरसे

सुधागड ता. वन परिक्षेत्र अधिकारी वन्यजीव-विकास तरसे



**गोरेगाव पश्चिम येथील सुभाष नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित मंगलमुर्ती सोसायटीच्या आवारात भारताचा राष्ट्रध्वज फडकवून ७८ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.सदर वेळी उपस्थित लहान मुलांनी देशभक्तीवर गीते गायिली. यावेळी स्थानिक रहिवाशांनी आणि सोसायटीतील सदस्य, पदाधिकारी, महिला मंडळ आणि लहान मित्रांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.**

# तिडे बौद्धवाडी शाळेत ७८ वा स्वातंत्र दिन उत्साहात साजरा

शेनाळे प्रतिनिधी :

जि.प.आदर्श शाळा तिडे बौद्धवाडीत १५ ऑगस्ट दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या वेळी शाळेतील मुलांनी मोठ्या हर्ष उल्हासाने घोषणा देत प्रभातफेरी काढून शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.केवळ खैरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.त्यानंतर सभागृहात आलेल्या मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. शाळेत एकूण १४ विद्यार्थी असून सर्व विद्यार्थ्यांनी भाषणामध्ये भाग घेतला. त्यातील काही विद्यार्थी यांनी इंग्रजी ,हिंदी व मराठीत भाषणे केली तसेच हायस्कूलच्या मुलांच्या सोबतीने समूहगीत सादर केले.



शाळेच्या पटांगणाला लादी बसवण्यासाठी श्री.नितिन लोखंडे,श्री.संदीप खैरे व श्री बलदोष खैरे प्रत्येकी ५०००रु.दिले तसेच गॅस घेण्यासाठी राजेंद्र जाधव ग्रामपंचायत सदस्य यांनी १००० रु. दिले.सर्व देणगीदारचा सन्मान करणेत आला.माता पालक गटाच्या लीडर सौ.निरीक्षा नितीन लोखंडे याना सरपंच श्रीम.धनसे मॅडम यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.श्री. नानु खैरे यांनी उत्तम भाषण केलेल्या१४ विद्यार्थी यांना पेन देऊन सन्मानित करण्यात आले. माजी विद्यार्थी खुशी खैरे हिने एक सुंदर गीत गायन केले.ङ्ग या कार्यक्रमाला संतोष खैरे,बलदोष खैरे,वसंत खैरे,आशा सेविका शेजल खैरे,पूनम खैरे,अश्विनी खैरे ,निशा जाधव,सायली खैरे,अतिष खैरे,सुजाता खैरे,रेखा खैरे माया आई,सुमन खैरे,सुमती खैरे, शिवानी जाधव,सुलोचना खैरे,राजेंद्र जाधव (ग्राम, सदस्य) या विजय खैरे ,वाडी अध्यक्ष प्रसाद खैरे ,नानु खैरे ,व सरपंच श्रीम.मुमताज धनसे आणि सभेच्या अध्यक्ष माजी सरपंच श्रीम.सुषमा खैरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाला वाडीतील बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित तसेच सर्वांनी समोसा व जिलेबी चा आस्वाद घेतला. ङ्ग स्वतंत्र दिनाच्या गाण्यावर शाळेचे विद्यार्थी, हायस्कूल, व कॉलेजचे विद्यार्थी व ग्रामस्थ यांनी ताल धरला व नाचण्याचा आनंद घेतला.संगीतखुर्ची हा खेळ आयोजित करण्यात आला होता.हा कार्यक्रम यशस्वी होण्यामागे शाळेचे मुख्याध्यापक श्री.नरेंद्र सकपाळ व उपशिक्षक श्री.दिलीप जाधव यांनी मोलाचे योगदान दिले.

# देशाप्रती राष्ट्राभिमान हवा - दिलीप पडवळ

बोर्लीपंचतन: ( केतन माळवदे )

श्रीवर्धन येथील, गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, श्रीवर्धन. येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त माजी सैनिक श्री. दिलीप पडवळ यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. सैनिक म्हणून कार्यरत असताना अत्यंत प्रेरणादायी




अंगावर शहारे आणणारे प्रसंग त्यांनी मांडलेत. प्रत्येक भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याबद्दल राष्ट्राभिमान, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रसन्मान व राष्ट्रप्रेम निर्माण झालेच पाहिजे. तरच भारत महासत्ता होऊ शकेल. असे विचार माजी सैनिक, श्री. दिलीप पडवळ यांनी याप्रसंगी व्यक्त केले. स्वातंत्र्यासाठी प्राणाची आहुती व बलिदान दिलेल्या क्रांतिकारकांना अभिवादन करून स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचे आव्हान युवकांसमोर आहे. त्यासाठी युवकांनी सर्वार्थाने सजग राहणे आवश्यक आहे, स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही स्वतंत्र्य नाही, नैतिकतेच्या चौकटीत राहून समाज व्यवस्थेचे भान ठेवून एकमेकांचा सन्मान करणे, आदर करणे आणि यातूनच सुसंस्कृत नागरिक तयार करणे ही काळाची गरज आहे. अशी भावना प्राचार्य, डॉ. श्रीनिवास जोशी यांनी व्यक्त केली. केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे 'हर घर तिरंगा अभियाना' अंतर्गत रॅली, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, राष्ट्रभक्तीपर गीत गायन स्पर्धेचेही आयोजन या प्रसंगी करण्यात आले. या निमित्ताने महाविद्यालय परिसरात प्रमुख अतिथी, श्री. दिलीप पडवळ, प्राचार्य, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी आणि एन. एस. एस. विभागाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य,श्री. किशोर लहारे सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी न्यू. इंग्लिश स्कूल आराठीच्या मुख्याध्यापिका, सौ. वैशाली सावंत व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी, स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आबलोली खालील पागडेवाडी विकास मंडळ आणि महिला मंडळ, मुंबई यांच्यावतीने विद्यार्थी गुणगौरव

आबलोली (प्रतिनिधी)

आबलोली खालील पागडेवाडी विकास मंडळ व महिला मंडळ यांच्या वतीने राजा शिवाजी विद्यालय, दादर येथे विद्यार्थी गुणगौरव सोहळा आणि शैक्षणिक मार्गदर्शन शिबिर हा कार्यक्रम मुंबई मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत रामजी पागडे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला.यावेळी शांताराम सखाराम पागडे( जेष्ठ मार्गदर्शक),यशवंत देवजी पागडे(अध्यक्ष-खालील पागडेवाडी विकास मंडळ,आबलोली),शुंभागी सोनू पागडे(महिलाध्यक्षा),सुहासिनी शंकर गोणबरे(महिला उपाध्यक्षा), साची सुनिल पागडे(सचिव) तसेच प्रमुख मार्गदर्शक वक्ते प्रा.अमोल पवार (वझे केळकर महाविद्यालय मुलुंड),सुनिल तानाजी कुळे (समूपदेशक) आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. विद्यार्थी-विद्यार्थीनी आणि पालकवर्ग यांच्या उपस्थितीत शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थीनी यांचा गुणगौरव सत्कार करण्यात आला. संकल्प राजेंद्र पागडे,सलोनी संकेत पागडे,अयांश स्वप्नील पागडे, परी दिपक पागडे, हार्दिक प्रशांत गोणबरे,निरज निलेश पागडे, स्वप्नजा दिपक गोणबरे,अनिषा नितेश पागडे, निरव नरेश गोणबरे, वीर सुनिल पागडे,आरोही दिपक पागडे,रूद्र शैलेश पाष्टे,लावण्या महेश पागडे, आर्णव परेश पागडे,विरा सुनिल पागडे,आर्या लक्ष्मण पागडे,अंश विजय पागडे, सोहम दिलीप गोणबरे, तनुज संदिप पागडे,आदित्य रत्नाकर फटकरे,वृद्धी दिपक पागडे,रिद्धी सचिन पागडे,आयुषी दिनेश पागडे, रिया महेश पागडे , श्रेया शैलेश पाष्टे, तेजस संजय पागडे ,आकांक्षा सचिन पागडे,समिरा संतोष फटकरे, तनुजा काशिराम पागडे,श्रीच सुनिल पागडे,निधी दिलीप पागडे,मंथन सुर्यकांत पागडे,आदित्य दिनेश गोणबरे ,अर्थव दिनेश पागडे,आर्यन रत्नाकर फटकरे, ओमकार मोहन आग्रे,पूजा अनंत आग्रे, गौरी अनंत आग्रे , विशेष प्राविण्य मध्ये मानस सुशांत पागडे (हस्तकला),रोहन सचिन पागडे , सलोनी शंकर गोणबरे या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.अमोल पवार यांनी विद्यार्थी म्हणून घडताना विद्यार्थी व पालकांचे जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले तसेच सुनील कुळे यांनी विविध स्पर्धा परीक्षा आणि त्या दृष्टीने करायची पूर्वतयारी याविषयी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन सुनिल पागडे,प्रास्ताविक संतोष फटकरे आभार प्रदर्शन सुशांत पागडे यांनी केले.



# शिवराज्य प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांचे वतीने युवक युवती संवाद सभा संपन्न.

तळा कृष्णा भोसले.

दि १३ ऑगस्ट २०२४ रोजी शेतकरी कामगार पक्षाचे राष्ट्रीय खजिनदार तथा मास्टर ऑफ आर्किटेक लंडन सन्माननीय श्री अतुल म्हात्रे साहेब व शिवश्री अ‍ॅड. रोशन पाटील (प्रदेशाध्यक्ष शिवराज्य संघटना ) यांनी नागोठणे येथे जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून शिवराज्य प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित केलेली युवक युवती संवाद सभा आणि शाळा वाचवा अभियान या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शन केले.स्वागताध्यक्ष मा.सतिश नारायण सुटे (सभासद) मा. ज्ञानेश्वर पांडुरंग सुर्यवंशी, ह.भ.प. दगडू महाराज दळवी,(रायगड भुषण) मा. धम्मशिल सावंत ( पत्रकार ) ह.भ.प. दिलीप महाराज शिंदे,(रायगड भुषण) भन्ते आधिचित्तो, (रायगड भुषण) ह.भ.प. महेश महाराज पोंगडे (अध्यक्ष स. वारकरी महासंघ रायगड) ह.भ.प. आशिष महाराज जाधव (श्रीक्षेत्र भंडारा डोंगर, देहू) मा.किशोर भाई म्हात्रे (आंदोलन सम्राट) मा. संतोष गायकवाड ( रोहा तालुका अध्यक्ष आरपीआय ) मा.बिनेदार साहेब (उद्योजक) मा. राहुल बिराडे जिल्हा अध्यक्ष ठाणे) मा. भाऊसाहेब गायकवाड (सामाजिक कार्यकर्ते ) मा. झेंडे सर (सामाजिक कार्यकर्ते) व पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने सामाजिक कार्यकर्ते राजकीय कार्यकर्ते उपस्थित होते. प्रास्ताविक: शिवश्री विकी कदम (प्रवक्ते शिवराज्य प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य) प्रमुख मार्गदर्शक: मा. अतुल नंदकुमार म्हात्रे (मास्टर ऑफ आर्किटेक्ट लंडन)अध्यक्षता: शिवश्री अ‍ॅड. रोशन पाटील (प्रदेशाध्यक्ष शिवराज्य संघटना ) सूत्रसंचालन: शिवश्री प्रभाकर ओव्हाळ (सभासद शिवराज्य प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य) आयोजक:शिवश्री हिमांशु पाटील (सचिव) शिवश्री डॉ. धनाजी सुरोसे (संपर्कप्रमुख) शिवश्री विराज जाधव (संघटक) शिवश्री अनिल सानप संघटक) (जिल्हाध्यक्ष) मा.महेंद्र ठाकूर, खांडेकर गुरुजी मा. सरपंच बोर्जे, मा.निलेश म्हात्रे ग्रामपंचायत सदस्य वडखळ,मा.राजन झेमसे सामाजिक कार्यकर्ते, सर,मा.प्रविण म्हात्रे इत्यादी उपस्थित होते.



# स्वातंत्र्यदिनी पंढरीतही उत्साह; आकर्षक तिरंगी विद्युत रोषणाई, फुलांच्या सजावटीने उजळला मंदिर परिसर

पंढरपूर : एकीकडे देशात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा होत असताना पंढरीचा विठुराया देखील देशप्रेमात न्हाहून निघाला आहे. मंदिराला तिरंगी रंगाची आकर्षक विद्युत रोषणाई तसंच फुलांची आरास करण्यात आली आहे. यात सावळ्या विठुरायाचे राजस सुकुमार रूप अधिकच खुलून दिसत आहे.स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराने आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. मंदिरावर, दर्शन मंडप, भक्त निवास येथे विद्युत रोषणाई केली आहे.तसेच मंदिरात देखील आकर्षक फुलांनी सजवले आहे. मंदिरातील प्रवेशद्वार, सोळखांबी, मंदिरा बाहेर अशा ठिकाणी तीन रंगांच्या फुलांची आरास करण्यात आली आहे. सलग सुट्टी व श्रावण महिना असल्याने भाविकांची गर्दी झाली आहे.फुलांची आरास केल्याने विठुरायाचे रूप अधिकच खुलून दिसत आहे. अशा या भक्ती रसात तीरंगी फुलांची आरास केल्याने देशप्रेमात देखील न्हाहून निघाला असं म्हणलं तर वावगे ठरणार नाही.



# आरोपांचा आधार

हिंडेनबर्ग अहवालात अदानी यांच्या समूहाचा संबंध असलेल्या आरोपांनी पुन्हा खळबळ निर्माण झाली आहे. हिंडेनबर्ग यांच्या दाव्यानंतर त्यांच्या अहवालात गेल्या दोन वर्षांपूर्वीही असाच आरोप केला होता आणि त्यानंतर अदानी समूहाचे शेअर्स कोसळले होते. सेबीच्या अध्यक्षा माधवी बूच यांनी हिंडेनबर्गचे आरोप फेटाळून लावले आहेत आणि त्याचवेळी हे आरोप म्हणजे निराधार आणि चारित्र्यहिनाचा प्रयास असल्याचे म्हटले आहे. हे आरोप म्हणजे कोणत्याही सच्चाईपासून अलिप्त असल्याचे त्यांनी म्हटले आहे. वास्तवात हिंडेनबर्गचा आरोप होता की, बूच आणि त्यांचे पती धवल बूच यांचा अदानी मनी सायफनिंग घोटाळ्यात वापरला गेलेला पैशाचा म्हणजे ऑफशोअर हिस्सेदारीत सहभाग होता.

बूच पती-पत्नींनी म्हटले आहे की, आमच्यावर केले गेलेले आरोप हे निराधार तर आहेतच, पण आमचे आतापर्यंतचे पुस्तक हे उघड्या पुस्तकासारखे आहे. आम्हाला कोणतीही वित्तीय कागदपत्रे दाखवण्यात कसलीही अडचण नाही. इतका सुस्पष्ट खुलासा केल्यानंतरही हिंडेनबर्ग यांच्या आरोपांचा आधार घेऊन भारतातील विरोधी पक्ष या विषयावर बवाल माजवत आहेत याचे कारण सुस्पष्ट आहे. ते म्हणजे हिंडेनबर्ग यांच्या आरोपांचा आधार घेऊन त्यांना पंतप्रधान मोदी आणि अदानी यांना लक्ष्य करायचे आहे.

गेल्या १०ऑगस्टला हिंडेनबर्ग यांच्याकडून आरोप केला गेला की, माधवी बूच यांनी अदानी सायफनिंग स्कँडलमध्ये वापरल्या गेलेल्या पैशात हिस्सेदारी होती. अदानी यांच्याशी संबंध असल्यामुळे सेबी या प्रकरणी काहीही कारवाई करण्यास तयार नव्हता. पण हे झाले आरोप-प्रत्यारोपांचे. पण भारताचे यात नुकसान झाले आहे ते अभूतपूर्व आहे. हिंडेनबर्ग कायम भारताविरोधात आणि विशेषतः मोदी सरकारविरोधात आरोप करण्यात पुढे असतो. कारण उघड आहे, ते म्हणजे त्यांना कोणत्याही परिस्थितीत मोदी सरकारला बदनाम करायचे आहे. त्यामुळे मोदी यांना बदनाम करून कशी तरी त्यांची प्रतिमा खराब करायची हा देशातील विरोधी पक्षांचा प्रबळ असा अजेंडा आहे.

पण देशातील जनता सूज्ञ आहे आणि ती अशा गैरप्रकार करणाऱ्यांच्या धोक्यात येणार नाही, असा विश्वास आहे. आता हिंडेनबर्ग या शॉर्ट सेलर कंपनीने आपल्या तोफा पुन्हा अदानी आणि त्याद्वारे मोदी यांच्याविरोधात डागण्यास सुरुवात केली आहे. यावेळी त्याचे लक्ष्य सेबीच्या अध्यक्षा माधवी बूच आहेत. बूच दांपत्यांवर केलेला आरोप हा भडकवणारा आणि दिशाभूल करणारा आहे.

गेल्या जानेवारीत सर्वोच्च न्यायालयाने सेबी या प्रकरणाची व्यापक आणि सर्वसमावेशक चौकशी करत आहे आणि त्यांच्या चौकशीतून जे सत्य येईल ते योग्य असेल असा निर्वाळा दिला होता. पण तरीही आताही या प्रकरणी पुन्हा वेगळी जेपीसी नेमण्याची मागणी करणे हे विरोधकांच्या षडयंत्राचा वास येणारे आहे. त्याच वेळेस सर्वोच्च न्यायालयाने असेही स्पष्ट केले होते की, विशेष चौकशी पथकाकडे या प्रकरणाची चौकशी देण्याची काहीच गरज नाही. तरीही भारतातील विरोधक या प्रकरणाचे भांडवल करून मोदी सरकारविरोधात मुद्दा उपस्थित करण्यासाठी त्याची ढाल म्हणून उपयोग करत आहेत. हे त्यांच्या क्षुद्रपणाचे निदर्शक आहे. हिंडेनबर्ग यांनी आरोप केला आहे की, बूच दांपत्यांनी आपल्याकडील कथित हिस्सेदारीच्या रकमेचा विनियोग करून, त्याचा उपयोग करून अदानी समूहात पैशाची हेराफेरी केली. पण या आरोप-प्रत्यारोपांमध्ये भारतातील विरोधी पक्षांची गोची झाली आहे. कारण त्यांना हे नक्की काय प्रकरण आहे तेच समजत नाही. त्यामुळे त्यांना नेहमीप्रमाणे मोदी यांना शिव्या घालायच्या पण त्या कशामुळे हे समजत नाही.

बूच दांपत्यांचा आरोप खरा आहे की, सेबीच्या विश्वासार्हतेवरच हिंडेनबर्ग आरोप करत आहे. त्याविरोधात सर्व पक्षांनी एकत्र येऊन लढा द्यायला हवा, पण विरोधी मात्र मोदी यांच्या द्वेषाने पछाडले आहेत, त्यामुळे ते एक होऊ शकत नाहीत. खरी गोष्ट अशी आहे की, जितके मोठे उद्योग समूह तितके त्यातील घोटाळे मोठे असे चित्र देशात तयार झाले आहे. हिंडेनबर्ग त्याला अपवाद नाही. एकीकडे सचोटीने उद्योग करून देशाला अभिमान वाटावा अशी कामगिरी करणारे काही उद्योग समूह देशात असताना अल्पावधीत पुढे जाण्यासाठी काहीही मार्ग वापरणारे उद्योग समूह आहेत. त्यापैकीच एक आहे हिंडेनबर्ग.

हिंडेनबर्गने यावेळी थेट सेबीमध्ये व्हिसलब्लोअर असलेल्या सेबीवर हल्ला बोल केला आहे. हे निश्चितच भारतासाठी वाईट आणि खेदजनक आहे. माधवी बूच यांनी अदानी समूहावर कारवाई केली नाही कारण त्यांचे त्यात हितसंबंध दडले आहेत, असा आरोप हिंडेनबर्ग यांचा आहे. बूच यांनी तो फेटाळला आहे हे खरे आहे. मागेही अदानी समूहावर हिंडेनबर्गने आरोप केले तेव्हा त्या उद्योगाचे शेअर्स कोसळले होते आणि त्यांचा एक व्यवहार झाला नव्हता. पण आताही तसेच करायचे हिंडेनबर्गच्या मनात होते. पण तसे काही यंदा होणार नाही. या प्रकरणाची चौकशी झाली मात्र पुढे काहीच निष्पन्न झाले नाही. तेव्हा केवळ प्रसिद्धी मिळवण्यासाठी मोठे उद्योग समूह असा गैरप्रकार करतात हे समोर आले होते. तेव्हा काहीच झाले नाही म्हणून हा दुसरा धक्का देण्यात आला असावा असे मानण्यास जागा आहे. कारण यंदा विरोधी पक्षांची स्थिती पूर्वीपेक्षा जास्त प्रबळ आहे आणि काँग्रेस आता जवळपास शंभर लोकसभेच्या जागा घेऊन आहेत. त्यामुळे राहुल गांधी आणि विरोधी पक्ष हे ताकदवान झाल्याचे समजत आहेत. पण त्यांनी कितीही ताकदवान झाल्याच्या गमजा केल्या तरीही विरोधी पक्षांना हिंडेनबर्गचा भस्मासूर गिळंकृत केल्याशिवाय राहणार नाही. यात खरे म्हणजे पहिल्या वेळेसच परिस्थिती सरकारने समोर आणून खरे काय ते लोकांसमोर ठेवले असते, तर हे सारेच प्रकरण पुढे टाळता आले असते.

# अर्ध्या जगावर 'एमफॉक्स' विषाणूचा कहर

नवी दिल्ली : कोरोना साथीतून जग आता पूर्णपणे सावरले आहे. मात्र आता एक नवे संकट समोर आले आहे. सध्या जगावर एमपॉक्स नावाच्या विषाणूचे संकट घोंघावत आहे. जगातील ११६ देशांमध्ये एमपॉक्स विषाणूचा प्रसार झाला आहे. एमपॉक्स विषाणूला आधी मंकीपॉक्स या नावाने ओळखले जात होते. जागतिक आरोग्य संघटनेने(डब्ल्यूएचओ) एमपॉक्स विषाणूचा कहर पाहता आपत्कालीन स्थिती जाहीर केली आहे. याचा त्रास झालेल्या व्यक्तीच्या शरीरावर पुरळ उठतात. हा विषाणू १९५८ मध्ये माकडांमध्ये सापडला होता. यानंतर तो मानवांमध्ये पसरू लागला आहे.

भारतात सध्या या रोगाचा प्रादुर्भाव काय आहे? असा प्रश्न प्रत्येकाच्या मनात येत आहे. मात्र, सध्या भारतात या विषाणूचा प्रभाव दिसून येत नाही. जागतिक आरोग्य संघटनेने आपल्या ताज्या अपडेटमध्ये म्हटले आहे की, भारतात जानेवारी २०२२ ते जून २०२४ दरम्यान एमपॉक्सची २७ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. या विषाणूमुळे एका व्यक्तीचा मृत्यूही झाला होता. आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, भारतात या प्रकारच्या विषाणूपासून कोणताही धोका होण्याची शक्यता नाही. त्यावर उपचार करू शकणा-या काही लसी उपलब्ध आहेत. याशिवाय, आंतरराष्ट्रीय विमानतळांवर काटेकोर निरीक्षण करून आणि संक्रमित लोकांची वेळेवर ओळख करून व्हायरस नियंत्रित केला जाऊ शकतो.काँगोमध्ये आतापर्यंत १४ हजारांहून अधिक रुग्ण आढळले आहेत. यामध्ये ५०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. १५ वर्षांखालील मुलीही या विषाणूचा बळी ठरत आहेत, ही चिंतेची बाब आहे. समलिंगी पुरुषांमध्ये या संसर्गाचे प्रमाण अधिक आहे. बाधित व्यक्तीच्या संपर्कातले आरोग्य कर्मचारी, कुटुंबीयांना देखील याचा धोका आहे. संसर्ग झाल्यानंतरही अंगावरील पुरळ पूर्ण बरे होईपर्यंत इतरांपासून दूर रहावे, जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे.

**अनेकांमध्ये संसर्ग : डब्ल्यूएचओ**

जागतिक आरोग्य संघटनेनं एमपॉक्स विषाणूचा कहर पाहता आपत्कालीन स्थिती जाहीर केली आहे. अनेक देशांमध्ये मंकी पॉक्सच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. जागतिक आरोग्य संघटनेने नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. एमपॉक्स देखील संसर्गजन्य आजार आहे. त्यामुळे परिस्थिती बिघडू नये यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने नागरिकांना काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे. आतापर्यंत अनेक लोकांमध्ये याचा संसर्ग दिसून आला आहे.दुस-यांदा आणीबाणी जाहीर एमपॉक्स विषाणूचा धोका लक्षात घेता जागतिक आरोग्य संघटनेने तीन वर्षांत दुस-यांदा आणीबाणी जाहीर केली आहे. यापूर्वी २०२२ मध्येही या विषाणूचा वेगाने प्रसार दिसून आला होता. एमपॉक्स विषाणूने १०० हून अधिक देशांमध्ये कहर केला होता. त्यावेळी २०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता. एमपॉक्सची लक्षणे

एमपॉक्स विषाणूमुळे व्यक्तीला त्वचेवर लाल पुरळ येतात, जे २-४ आठवडे राहू शकतात. या रुग्णाला ताप, घसा खवखवणे, डोकेदुखी, स्नायू दुखणे, पाठदुखी, अत्यंत थकवा येणं आणि सुजलेल्या लिम्फ नोड्स म्हणजेच शरीरावर गुठळ्या होऊ शकतात. एमपॉक्स असलेले बहुतेक लोक पूर्णपणे बरे होतात, परंतु काही गंभीर आजारी होऊ शकतात.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
शनिवार १७ ऑगस्ट २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## इंग्लिश मिडीयम स्कूल,आबलोली येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

आबलोली(प्रतिनिधी)

एक्सलंट अर्कॅडमी इंग्लिश मिडीयम स्कूल,आबलोली येथे चंद्रकला फाऊंडेशनच्या सेक्रेटरी स्नेहल सचिन बाईत यांच्या हस्ते ७८ वा स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्व विद्यार्थी, शिक्षक ,पालक यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी राष्ट्रगीत, राज्यगीत, ध्वजगीत , समूहगीत गायन करण्यात आले.

यानंतर इ.९वी व १०वी च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या स्वातंत्र्य दिनाच्या फलकाचे अनावरण स्नेहल बाईत व डॉ.गौरी अतुल गावड यांच्या हस्ते करण्यात आले. इ.१ली ते ४ थी चे विद्यार्थी यावेळी वेगवेगळ्या वेशभूषा करून आले होते.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सचिन चंद्रकांत बाईत, सेक्रेटरी स्नेहल सचिन बाईत यांनी मुलांनी विविध प्रकारच्या शैक्षणिक उपक्रमामध्ये उस्फूर्तपणे सहभाग घ्यावा याबद्दल मार्गदर्शन केले तसेच सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



यावेळी मुख्याध्यापिका नेत्रा नरेंद्र रहाटे ,साळुंखे एस एस, सौ. मुल्ला एस.आर,शिगवण पी.एस,केंबळे टी.जे,गोणबरे डी.एस.,पवार एस.एस, साळवी प्रसाद प्रदिप पालक आदी उपस्थित होते.

## तिडे आदिवासीवाडी शाळेत ७८ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

ता.- मंडणगड
दि.१५/८/२०२४

जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा तिडे. आदिवासीवाडी, ता.मंडणगड,जि.रत्नागिरी या शाळेमध्ये भारतीय स्वातंत्र्याचा ७८वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.तत्पूर्वी हर घर तिरंगा अभियानांतर्गत दिनांक १३ ऑगस्ट २२०२४ व १४ ऑगस्ट २०२४ या दिवशी वेगवेगळे उपक्रम घेण्यात आले. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सकाळी विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य,माता पालक संघ, शिक्षक पालक संघ,अंगणवाडी सेविका, मदतनीस ,अंगणवाडीतील विध्यार्थी व वाडीतील ज्येष्ठ श्रेष्ठ असे सगळे



मान्यवर प्रभात फेरीमध्ये समाविष्ट झाले.हातात तिरंगा ध्वज घेऊन व घोषणा देत ढोल वाजवत वाडीतून जल्लोषात प्रभात फेरी काढण्यात आली. त्यानंतर वाडीतील ज्येष्ठ तसेच माजी पोलीस पाटील श्री. दत्ताराम हिलम यांच्या हस्ते शाळेचे ध्वजारोहण करण्यात आले. तद्नंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते व स्वातंत्र्य दिनाबद्दल भाषणे केली. स्वातंत्र्य दिनाच्या वेगवेगळे उपक्रम घेण्यात आले यामध्ये पाढे पाठांतर स्पर्धा, रंगभरण स्पर्धा घेण्यात आली. विजेत्या स्पर्धकांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.विद्यार्थ्यांच्या मनोगतानंतर उपस्थित मान्यवर यांनी स्वातंत्र्य दिनाबद्दल माहिती व शुभेच्छा दिल्या. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. नागेश हिलम यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना गोड पदार्थाचे वाटप करण्यात आले. शाळेतील मुख्याध्यापक श्री. निलेश लोखंडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर शाळेतील शिक्षिका सौ.वर्षा जाधव मॅडम यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## ग्रुप ग्रामपंचायत कवडोली रावतोली ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा.

केळशी प्रतिनिधी.

ग्रामपंचायत कवडोली रावतोली मध्ये १५ ऑगस्ट २०२४ भारतीय ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा मोठा उत्साहात करण्यात आला. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सकाळी दोन्ही गावचे विद्यार्थी, पालक ,माजी विद्यार्थी, ग्रामपंचायत सदस्य ,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, व सदस्य, माता पालक संघ, शिक्षक पालक संघ, अंगणवाडी सेविका, मदतनीस, अंगणवाडीतील विद्यार्थी, कवडोली शाळेचे शिक्षक सुर्वे गुरुजी, रावतोली शाळेच्या शिक्षिका हेमलता ठेपले बाई, कवडोली रावतोली मधील जेष्ठ नागरिक, दोन्ही गावचे अध्यक्ष, तसेच



दोन्ही गावचे पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य या सर्वांनी हजेरी लावली. सरपंच चिंचघरकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कवडोली शाळेचे शिक्षक सुर्वे गुरुजी यांनी सूत्रसंचालन केले. उपसरपंच, माजी सरपंच यांनी आपले मनोगत व्यक्त केले. रावतोली ज्येष्ठ नागरिक सदानंद शिगवण (शाहीर) यांनी आपल्या शाहिरी ठेक्यात लोकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थी व लोकांना गोड पदार्थ वाटप करून सांगता करण्यात आली.



**भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्या दिना निमित्त गोरेगाव पश्चिम येथील चंद्रमणी बुध्द विहार येथे बौध्दजन पंचायत समिती शाखा क्र. ३८५ च्या वतीने सदर विहाराच्या आवारात राष्ट्रध्वज फडकवून त्यास मानवंदना देण्यात आली. यावेळी अध्यक्ष मंगेश जाधव, उत्तम जाधव, जगताप साहेब, मनोहर तांबे,श्रीधर खांबे, संतोष कदम आदी मान्यवर तसेच विविध शाखेच्या महिला मंडळ आणि लहान मुले उपस्थित होती. सदर वेळी उपस्थीत मान्यवरांनी स्वतंत्र भारताविषयी आपले मनोगत व्यवत करून सदर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.**

## ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पाच्छापुर माध्यमिक शाळेला जे. एस. एम. कॉलेज अलिबाग २००१ कला शाखेच्या बॅच कडून शालेय उपयोगी वस्तूंची मदत

अलिबाग प्रतिनिधी राजेश बाष्टे:

जे. एस. एम. कॉलेजच्या २००१ च्या कला शाखेतील विद्यार्थ्यांनी आपला ७८ वा स्वातंत्र्यदिन वेगळ्या पद्धतीने साजरा



केला. पाच्छापुर शाळेत १५० पेक्षा जास्त शिक्षण घेत असून ९५% विद्यार्थी हे आदिवासी आणि ठाकूर समाजातील आहेत. शाळेतील मुख्याध्यापक श्री. माळी सर व या शाळेला नेहमी मदत करणाऱ्या ट्रेक क्षितिज संस्था डोंबिवली यांच्या मदतीच्या आव्हानाला प्रतिसाद देत या शाळेला जे. एस. एम. कॉलेज ग्रुप तर्फे आज एक कपाट, माईक, स्पीकर, तसेच किशोरवयीन मुलींसाठी सॅनिटरी नॅपकीन भेट देण्यात आले. हे सर्व सामान विद्यार्थ्यांनी वर्गणीतून जमवले तसेच मुंबई येथील रिदय फाऊंडेशन या संस्थेमार्फत ११० लिहायचे मिळवून देण्यात आले. तसेच ग्रुप तर्फे २० विद्यार्थिनींची दहावीची परीक्षा फी सुद्धा देण्यात आली व किशोरवयीन मुलींसाठी एक मार्गदर्शन सेमिनार आयोजित करण्यात आले. जे. एस. एम. महाविद्यालयातील ६६ विद्यार्थ्यांनी या कार्यात मदत केली. ङ्गआजच्या या कार्यक्रमासाठी जे. एस. एम. महाविद्यालयातून रसिक काळे, निलेश पाटील, सचिन गुरव, मनोज गावंड, सुहास तेलगे, ज्योती मगर, अश्विनी पाटील, साक्षी गुरव व ज्योती तेलगे हे सर्व सदस्य उपस्थित होते. तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद, ग्रामस्थ तसेच ट्रेक क्षितीज संस्थेचे सर्व सदस्य देखील उपस्थित होते. मुख्याध्यापक श्री. माळी सर तसेच संस्थेचे अध्यक्ष यांनी जे. एस. एम. कॉलेज ग्रुप चे आभार व्यक्त केले.(फोटो -तुषार डिजिटल अलिबाग)

## सामाजिक विकास केंद्र शृंगारतळीला सुमेध मोहिते यांच्याकडून इन्व्हर्टर कम यूपीएस संच भेट..!

आबलोली (संदेश कदम)ङ्ग समता सैनिक दल प्रेरित, एस. एस. डी. ट्रस्ट संचलित, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू असलेले गुहागर तालुक्यातील सामाजिक विकास केंद्र शृंगारतळी, या केंद्राला एक तरुण यशस्वी व्यावसायिक सुमेध एस. मोहिते ( पाथर्डी, ता. चिपळूण) यांनी इन्व्हर्टर कम युपीएस (अंदाजे १५ ते १६ हजार रुपये किंमतीचा) संच भेट दिला.ङ्ग सामाजिक कार्याची उत्तम जाण आणि तळमळ असलेले नि:स्वार्थी, परखड आदर्शवत व्यक्तिमत्व, तरुणांवर चांगली वचक ठेवून त्यांना योग्य मार्गदर्शन करणारे, शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होऊनही गेली अनेक वर्षे सामाजिक कार्य अविरतपणे सुरू असलेले चिपळूण तालुक्यातील सामाजिक क्षेत्रातील एक मोठं आणि आदरयुक्त नाव, एस. डी. मोहिते (पाथर्डी, ता. चिपळूण) यांच्या सामाजिक कार्याचा वारसा चालवत त्यांचे सुपुत्र सुमेध एस. मोहिते यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ''पे बॅक टू सोसायटी'' या संकल्पनेला हातभार लावला आहे. सुमेध हे एक यशस्वी व्यावसायिक असून तरुणांना आदर्शवत काम ते नेहमीच करत असतात. शिक्षणाविषयी अतिशय तळमळ असल्याने त्यांनी शृंगारतळी येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू असलेल्या सामाजिक विकास केंद्राला इन्व्हर्टर कम यूपीएस संच भेट देऊन तरुणांमध्ये पुन्हा एकदा आदर्श निर्माण केला आहे. हा संच मिळण्यासाठी या केंद्राच्या व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष भीम मार्शल प्रमोद रामचंद्र पवार यांनी प्रयत्न केले.ङ्ग सुमेध मोहिते यांनी स्वतः येऊन हा संच कार्यालयाला भेट दिला. यावेळी समता सैनिक दल महाराष्ट्र राज्य मुख्य प्रशिक्षक भीम मार्शल संतोष मोहिते , मोहिते नर्सिंग होम (कळंबस्ते, ता.चिपळूण) च्या सर्वेसर्वा भीम मार्शल डॉक्टर साक्षी मोहिते, भीम मार्शल अरुण चव्हाण (शासकीय ठेकेदार), या केंद्राच्या व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष भीम मार्शल प्रमोद रामचंद्र पवार, उपाध्यक्ष भीम मार्शल सुनील सखाराम जाधव (माजी सैनिक), पाट पन्हाळे ग्रामपंचायत चे लिपिक भीम मार्शल सुदेश हडकर, या केंद्राचे ऑफिस असिस्टंट भीम मार्शल शीलवंत पवार हे उपस्थित होते.ङ्ग यावेळी स्थानिक व्यवस्थापन कमिटीच्या वतीने सुमेध मोहिते यांचे व त्यांच्या संपूर्ण परिवाराचे आभार मानून त्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच केंद्राला प्रथमच भेट देणाऱ्या भीम मार्शल डॉ. साक्षी मोहिते , शासकीय ठेकेदार भीम मार्शल अरुण चव्हाण, भीम मार्शल सुदेश हडकर यांनाही पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.



भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगोलोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सितराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफिसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफिससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायक्षेत्र )